# यांत्रिकी उपविभाग ( ग्रापापु )
# जिल्हा परिषद, रत्नागिरी

........................................................................................................................

ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी या कार्यालयामध्ये **"कंत्राटी कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)"** हे एक पद कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आहे. सदर पदांची संख्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता याची माहिती पुढीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | एकूण पदे | शैक्षणिक अर्हता | मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | कंत्राटी कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | १ | अ) मान्यता प्राप्त संस्थेची यंत्र अभियांत्रिकी मधील पदविका किंवा पदवी<br>ब) मराठीचे ज्ञान आवश्यक<br>क) संगणकाचे ज्ञान आवश्यक<br>( Computer Literate With Working Knowledge MS- Office ) | एकत्रित मानधन र. रु. २०,०००/- ते र. रु. २२,०००/- व इतर भत्ते अनुक्रमे पदविका व पदवी धारकांसाठी. |

इच्छूक उमेदवारांनी जाहिरातीचा व सुचनांचा अभ्यास करुन आपला सर्व कागदपत्रांसह सोबतच्या विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह दि. १४.०८.२०१९ रोजी सायं. ०५:४५ वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, पहिला मजला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, जिल्हा परिषद रत्नागिरी, या पत्त्यावर पोस्टाने अथवा प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत सादर करावा. विहित तारखेनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. तसेच अपूर्ण स्वरुपात आलेले अर्ज पदभरती प्रक्रियेसाठी विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. पदभरती प्रक्रियेत बदल करणेचा अथवा रद्द करणेचे अधिकार निवड समितीस राहतील.

# <u>अटी व शर्ती</u>

१ अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वयाचा पुरावा, जातीचा दाखला व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असलेबाबत प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. तसे न केल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारण्यात येईल.

२ अर्जासोबत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी र. रु. ५००/- व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी र. रु. २५०/- चा " कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद रत्नागिरी" यांचे नावे असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) अर्जासोबत जोडावा. परिक्षा शुल्क न जोडलेले अर्ज अपात्र समजणेत येतील. अर्जासोबत अनुभव प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

३ लिफाफ्यावर ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे.

४ उमेदवाराने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यानुसार A-४ आकाराच्या कागदावर एकाच बाजूला संगणकावर टंकलिखीत अर्ज करावा.

५ उमेदवाराने अर्जावर पासपोर्ट आकाराच्या अलिकडील रंगीत फोटो लावून त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी.

६ अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दि. १४.०८.२०१९ रोजी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा किमान १८ वर्ष व कमाल ३८ वर्ष अशी राहील. तसेच मागास / अपंग प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा किमान १८ वर्ष व कमाल ४३ वर्ष राहील.

७ अर्जासोबत २३X१३ सेंमी. आकाराच्या स्वत:चे नाव व पत्ता असलेला र. रु. १०/- तिकीट लावलेला एक लिफाफा पाठवावा.

८ उमेदवाराने विहित नमुन्यात भरुन पाठविलेले अर्ज जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते दिनांक १४.०८.२०१९ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पोस्टाने अथवा हातरवानगीने पाठवावेत. कोणत्याही कारणाने विलंबाने प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

९ अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची यादी **www.ratnagiri.nic.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांना आवश्यकतेनुसार मुलाखतीसाठी स्वखर्चाने परिक्षेच्या ठिकाणी हजर रहावे लागेल. या बाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

१० महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. ग्रापाधो-१११३/ प्र.क्र. १६७ /पापु-०७ दि. ०४.०६.२०१४ मधील जोडपत्र -२ निवड करण्यासाठी गुणदान पध्दती अवलंबिण्यात येईल.

११ मुलाखतीबाबतचे वेळापत्रक नंतर प्रसिध्द करण्यात येईल. निवड झालेला उमेदवार ८ दिवसात कार्यालयात हजर न झाल्यास सदरहू नियुक्ती आदेश रद्द समजणेत येईल.

१२ न्यायालयीन स्थगिती / निवाडा किंवा शासन निर्णयामुळे निवड प्रक्रिया कुठल्याही स्तरावर स्थगित अथवा रद्द अथवा बदल करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील.

१३ विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण अथवा चुकीचे भरलेले अर्ज, संगणकावर टंकलिखीत नसलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, जातीचा दाखला, अनुभव इ. संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती नसलेले अर्ज, विहित केलेले परिक्षा शुल्क न जोडलेले अर्ज, विहित मुदतीत प्राप्त न झालेले अर्ज अन्य मार्गाने शुल्क भरलेले अर्ज अपात्र समजणेत येतील.

१४ निवड झाल्यानंतर र. रु. १००/- च्या मुद्रांक पेपरवर आवश्यक अटी व शर्तीनुसार करारपत्र करुन द्यावे लागेल.

१५ सदरचे पद कंत्राटी पध्दतीचे असल्याने भविष्यात सदरची नेमणूक नियमित शासकीय सेवा म्हणून ग्राह्य धरली जाणार नाही. अथवा सदर बाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

# <u>अर्जाचा नमुना</u>

| उमेदवाराचा अलीकडे काढलेला स्व-स्वाक्षरीत फोटो |
|---|

**पदाचे नांव-**

१.उमेदवाराचे संपूर्ण नाव (आडनाव प्रथम):-

२.जन्मतारीख (सोबत आवश्य कागदपत्रे):-

अर्ज करण्याच्या अंतिम दि.          रोजी वय:-

३. जन्माचे ठिकाण :-

४.(अ)जात

(ब)जातीचा प्रवर्ग (योग्य तेथे (√ )खूण करावी)

| अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र | इ.मा.व | एस. ई.बी.सी. | ई. डब्ल्यु. सी. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

उन्नत व प्रगत (क्रिमीलेअर) गटात समाविष्ठ असणाऱ्या वि.जा. (अ), भ.ज.(ब),भ.ज.(क).भ.ज. (ड).वि.मा.प्र. इ.मा. व.,एस ई.बी.सी. व ई. डब्ल्यु. सी. प्रवर्गातील उमेदवारांनी सुरु असलेल्या आर्थिक वर्षाचे नॉन किमीलेयर प्रमाणपत्र सोबत जोडावे अन्यथा खुला प्रवर्ग नमुद करावा.

५. अर्जदार विवाहीत / अविवाहीत (√ ) अशी खूण करावी.

| विवाहीत | अविवाहीत |
|---|---|
| | |

६.शैक्षणिक/तांत्रिक पात्रता ( इ. १० वी पासून )

| अ.क्र. | उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्कवारी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

७. अवगत असलेल्या भाषा :-

| अ.क्र. | भाषा | बोलता येते (होय / नाही ) | वाचता येत (होय / नाही ) |
|---|---|---|---|
| १. | मराठी | | |
| २. | इंग्रजी | | |
| ३. | इतर | | |

८. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता व ई-मेल ( पत्ता पीन कोडसह ) :-

९. संपर्कासाठी दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्र ( वैयक्तिक व कार्यालयीन ) :-

१०. शासकीय सेवेतील कामाचा किमान ६ महिन्याचा अनुभव ( कालानुक्रम निहाय ) :-

| अ.क्र. | काम केलेली संस्था व पत्ता | कामाचा कालावधी | | पदाचे नाव व वेतन | कामकाजाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यत | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११. सध्याचे कामाचे प्रकार (कंत्राटी / नियमित ) :-

१२. इतर तपशिल

## प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणीत करतो / करते की, प्रस्तुत पदाची जाहिरात वाचली असून त्यातील पदविषयक माहिती मी काळजीपूर्वक वाचली आहे व मला ती मान्य आहे. सदर परिक्षेस प्रवेश मिळविण्यासाठी नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीची मी पूर्तता करतो /करते याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे मला दिलेला प्रवेश रदद होईल आणि मिळालेली नोकरी गमावण्यास मी बांधील राहीन व पुढील योग्य त्या कार्यवाहीस मी पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

स्थळ -
दिनांक- उमेदवाराचे संपुर्ण नाव व स्वाक्षरी